| सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,<br>ठाणे शहर<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>भ्रमरध्वणी क्र.9819208279 | |
|---|---|---|

**प्रेसनोट** दि.०५.१०.२०२४

## “ ध्वनीप्रदुषणाबाबत जाहीर आवाहन ”

सद्या सर्वत्र सणासुदीचे दिवस असुन सर्व धर्मिय त्यांचे सण उत्साहात साजरे करण्याचा प्रयत्न करीत असतात, मात्र उत्साहाच्या भरात कधी-कधी कायद्याचे पालन होत नाही व त्यामुळे त्यांना पोलीस कारवाईला सामोरे जावे लागते.

भारत देशात निरनिराळे असंख्य कायदे अस्तित्वात आहेत पण त्या सर्व कायदयांची माहिती सर्वसामान्य जनतेला असतेच असे नाही व त्यामुळे उत्साहाच्या भरात तसेच कायद्याचे ज्ञान नसल्याने त्यांना पोलीस कारवाईला सामोरे जावे लागले व त्यामुळे सदर सण/उत्सव साजरे करण्याच्या नादात निराशा पदरी पडते. सद्या सण/उत्सव साजरे करीत असताना तसेच मिरवणुकीच्या वेळी ध्वनीक्षेपक (लाउड स्पिकर) चा वापर करण्याचा प्रघात असल्याने उत्सव मंडळे विविध प्रकारच्या अत्याधुनिक साधनसामुग्रीच्या ध्वनीक्षेपकाचा उदा.डॉल्बी, डि.जे. इत्यादीचा वापर करीत असतात ज्यामध्ये ध्वनीचे प्रमाण हे अतिशय जास्त असते. त्यामुळे सामान्य जनतेच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर विपरीत परिणाम होत असतो.

सद्या सुरु असलेले सण उत्सव सर्व नागरीकांना उत्साहात साजरे करता यावेत या निखळ भावनेने ठाणे पोलीस आयुक्तांकडुन ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत सर्व जनतेला खालीलप्रमाणे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

आपल्या देशात निरीनिराळया मार्गाने निर्माण होणाऱ्या ध्वनीप्रदुषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनीप्रदुषण ( विनीयमन व नियंत्रण) अधिनियम-२००० अन्वये चे कायदे अस्तित्वात आहेत. सदर कायदयाचे उल्लंघन केल्यास ०५ वर्षापर्यंतची कैद व ०1 लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा असे कायदयात प्रयोजन केलेले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक - याचिका-२०१५/प्र.क्र.०६/पां.क.1 दिनांक २८/०७/२०१५ अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र.१७३/२०१०, दि.१३/०३/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये ध्वनीप्रदुषण ( विनीयमन व नियंत्रण ) अधिनियम-२००० या कायदयाची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश पोलीसांना दिले आहेत. त्यात रात्री १०.०० वा. ते सकाळी ०६.०० वा. च्या दरम्यान कोणत्याही प्रकारचे ध्वनीक्षेपक वापरण्यात मनाई करण्यात आली असुन त्यात बंद जागा उदा.ऑडीटोरियम, कॉन्फरन्स हॉल, कम्युनिटी हॉल, बॅन्क्वेट हॉल इत्यादी वगळण्यात आले आहे. तसेच काही ठराविक दिवशी ध्वनीक्षेपक वापराची परवानगी रात्री १२.०० वा. पर्यत वाढविण्याचे अधिकार राज्य शासनास देण्यात आले आहेत.

सदर कादयानुसार खाली नमुद केलेल्या मर्यादेपेक्षा आवाजाची पातळी असणार नाही याची सर्व नागरिकांना जाणीव असणे आवश्यक आहे.

| क्षेत्र | दिवसा (०६.०० ते २२.०० वा.) | रात्री (२२.०० ते ०६.०० वा.) |
|---|---|---|
| औद्योगिक क्षेत्र | ७५ डी.बी.(अे) एलईक्यू | ७० डी.बी.(अे) एलईक्यू |
| व्यापारी क्षेत्र | ६५ डी.बी.(अे) एलईक्यू | ५५ डी.बी.(अे) एलईक्यू |
| निवासी क्षेत्र | ५५ डी.बी.(अे) एलईक्यू | ४५ डी.बी.(अे) एलईक्यू |
| शांतता क्षेत्र | ५० डी.बी.(अे) एलईक्यू | ४० डी.बी.(अे) एलईक्यू |

वर नमुद आवाजाच्या मर्यादेपेक्षा जास्त आवाजाची पातळी आढळल्यास किंवा तशी तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितावर उपरोक्त कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. अश्या प्रकारे आवाजाची पातळीची मर्यादा उल्लंघन होत असल्याचे निर्दशनास आल्यास जनतेने ठाणे पोलीस विभागाच्या ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा पोलीस नियंत्रण कक्ष, ठाणे यांचे दूरध्वनी क्रमांक ०२२/२५४४३५३५, ०२२/२५४४३६३६, ०२२/२५४४२८२८ यावर संपर्क साधुन तक्रार नोंदवावी.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर